# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**५३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०१.०९.२०२६**

जिल्हा : नंदुरबार

| मागील आठवड्यातील हवामान (२५/०८/२०२६ ते ३१/०८/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०२/०९/२०२६ ते ०६/०९/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | < दिनांक > | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | १ | १ | ४ | ६ | ५ |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३२ | ३२ | ३१ | २९ | २९ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २५ | २५ | २५ | २६ | २६ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ७ | ७ | ७ | ८ | ७ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८४ | ८६ | ८५ | ८८ | ८८ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६७ | ६६ | ७६ | ७६ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १४ | १३ | १४ | १४ | १० |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच **दि. ४ व ६ सप्टेबर रोजी काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **पिकाना गरजेनुसार संरक्षित पाणी द्यावे.** |
| कपाशी | फुले उमलणे ते बोंड धरणे | पिक वाढीच्या अवस्थेमध्ये पावसाचा खंड पडल्यास गरजेनुसार पाणी १० ते १५ दिवसानी पाण्याचे व्यवस्थापन करावे.<br>रसशोषक किडींसाठी नियमित पाहणी करा. पिवळे चिकट सापळे लावा. गरजेनुसार ५% कडुनिंब बी अर्क किंवा अझाडिरॅक्टीनची फवारणी करावी. आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास शिफारशीनुसार कीटकनाशक वापरावे.<br>गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टर 5 फेरोमोन सापळे लावून नियमित निरीक्षण करावे. |
| तुर | फांद्या फुटण्याची अवस्था | तूर हे खरीप हंगामामधील पीक असल्यामुळे ते पावसावर वाढते. तथापि पावसामध्ये खंड पडल्यास किंवा पाण्याचा ताण पडल्यास आणि सिंचनाची सुविधा असल्यास पिकास वाढीच्या अवस्थेमध्ये (३० ते ३५ दिवस) पाणी द्यावे. किंवा २ टक्के युरियाची फवारणी किंवा ६ ते ८ टक्के केओलीनची फवारणी करावी.<br>स्टेरिलिटी मोझेंक व्हायरस हा इरीओफाइड माइट्सद्वारे पसरतो, म्हणून या किडीचे नियंत्रण करण्यासाठी प्रोपार्गाइट ५७ ईसी @ १० मिली किंवा फेनाझाक्विन १० ईसी @ १० मिली किंवा फेनपायरॉक्सिमेट ५ ईसी @ १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | फुलोर्याची अवस्था | पिक फुलोऱ्यात असताना (पेरणीनंतर ४५ ते ५० दिवसांनी), पावसाचा खंड पडून पिकाला पाण्याचा ताण पडल्यास गरजेनुसार पाणी द्यावे.<br>स्पोडेपटेरा अळीचा आगाऊ अंदाज घेऊन नुकसान टाळण्यासाठी प्रती हेक्टरी ५ फेरोमेन सापळे लावावेत.<br>गर्डल बीटल किडीच्या नियंत्रणासाठी पिकावर क्विनालफॉस २५ ईसी @ २० मिली किंवा प्रोफेनोफॉस ५० ईसी @ १० मिली किंवा क्लोरॅंट्रानिलीप्रोल १८.५ एससी @ ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मूग, उडीद | शेंगा भरण्याची अवस्था | पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी कोळपणी करावी.<br>ही पिके सर्वस्वी पावसावर येणारी आहेत. त्यामुळे या पिकांना फुले येताना पाऊस नसेल आणि जमिनीत ओलावा कमी झाला असेल तर फुले येण्याच्या आणि शेंगा भरण्याच्या काळामध्ये हलके पाणी द्यावे किंवा २% युरियाची फवारणी करावी. |
| भुईमूग | आ-या | खरीप भुईमूगास फुले येण्याची अवस्था (पेरणीनंतर २५ ते ३० दिवस), आऱ्या सुटण्याची अवस्था (३५ ते |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | **उतरण्याची अवस्था** | ४५ दिवस) या अवस्थांमध्ये पावसाने ताण दिल्यास संरक्षित पाण्याची पाळी द्यावी. आऱ्या जमिनीत जाण्याच्या वेळी तसेच शेंगा पोसण्याच्या कालावधीत पाण्याचा ताण पडू देवू नये. पीक बाष्पोपर्णोत्सर्जनाच्या ८० टक्के पाणी दिवसाआड द्यावे. |
| **मका** | **पिकाची वाढ होण्याची अवस्था** | जमिनीत ओलावा कमी झाला असल्यास पिकास गरजेनुसार पाणी दयावे.<br>फॉल आर्मीवर्मचा (लष्करी अळीचा) प्रादुर्भाव दिसून येताच, ब्युवेरिया बेसियाना किंवा मेटारहिझियम ॲनिसोप्लिया @ ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **भाजीपाला पिके** | | मागील तीन आठवड्यापासून पावसाचे प्रमाण अत्यल्प असून पुढील पाच दिवसातही समाधानकारक पावसाची शक्यता नसल्याने भाजीपाला पिकांवर पाण्याचा ताण येण्याची शक्यता आहे. ठिबक सिंचनाद्वारे पिकांना गरजेनुसार अल्प प्रमाणात व वारंवार पाणी द्यावे.<br>जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी पिकांच्या दोन ओळींमध्ये सेंद्रिय आच्छादन वापरावे.<br>भाजीपाला पिकांमधील तन नियंत्रण करून पिकांची होणारी पाण्याची स्पर्धा कमी करावी.<br>टोमॅटो मिरची वांगी व वेलवर्गीय पिकांमध्ये फुलोरा व फळधारणेच्या अवस्थेत पाण्याचा ताण पडू देऊ नये.<br>कांदा व पालेभाज्यांना उपलब्ध पाण्यानुसार हलके व नियमित सिंचन करावी पाण्याचा ताण पडल्यास पाणी कोम असतात व उत्पादनाची गुणवत्ता कमी होण्याची शक्यता असते.<br>काकडी दुधी भोपळा कारले व इतर वेलवर्गीय पिकांमध्ये फुलगळ फळगळ वाढत असल्यास जमिनीमध्ये वापसा राहील असे पाणी द्यावे व पीक फुलोऱ्यात असताना NAA २० पीपीएम व बोरॉन २० पीएम चा वापर करावा.<br>कीड व रोगांची लक्षणे आढळून आल्यास प्रतिबंधात्मक स्वरूपात रासायनिक कीटकनाशके बुरशीनाशके फवारू नये. गरजेनुसार शिफारसी प्रमाणे उपाय योजना कराव्यात. |
| **मिरची** | | फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी कडुनिंबाची भुकटी ५०० ग्रॅम (५% आर्क) किंवा कडुलिंबाचे तेल ५० मि.ली किंवा कडुनिंब आधारित फॉर्म्युलेशन १० मिली (५ ईसी) ते ५० मिली (०.०३ ईसी) प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **सिंचन व पाणी व्यवस्थापन** | | पावसामध्ये खंड पडल्यास विहीर/ बोरवेल/ शेततळयातील उपलब्ध पाण्याचा वापर करून पिकांना तुषार सिंचन किंवा ठिबक सिंचनाद्वारे हलके पाणी द्यावे. पाण्याचे बाष्पीभवन टाळण्यासाठी सकाळी किंवा संध्याकाळी पाणी द्यावे. आच्छादनाचा वापर करावा. पिकांच्या दोन ओळींमध्ये कोळप्याच्या किंवा बळीराम नांगराच्या साह्याने सरी पाडून पाणी दिल्यास पाण्याची बचत होते. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : ०१.०९.२०२६

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**